M. S. KHADI & V. I. BOARD
MUMBAI-1
BRANCH ०8
DATE ६।३।२०१४
No. 9903

**"साबण फिनेल" या बाबीच्या दरनिश्चितीस मुदतवाढ.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**
**परिपत्रक क्रमांक भांखस/साबण व फिनेल/दरनिश्चिती/(१२)/२०१४-२०१५/सी-2953**
**दिनांक :- 04 MAR 2014**

**वाचा**

1. **शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उ-६, दिनांक ०२/०१/१९९२.**
2. **उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस २०१३/प्र.क्र.७९/१३/उद्योग-४, दिनांक ३/३/२०१४.**
3. **मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती निर्णय क्र.०५, दिनांक ०४/०३/२०१४.**

उद्योग संचालनालयाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास सन २०१२-२०१३ साठी शासकीय विभागांना साबण फिनेल पुरविण्यासाठी आदेश क्र.भांखसं/साबण व फिनेल/दरनिश्चिती/(३६)/२०१२-२०१३/सी-९१७९, दिनांक ४ ऑक्टोंबर २०१२ नुसार दरनिश्चिती दिली होती. या दरनिश्चितीची मुदत दि.३०/६/२०१३ रोजी संपुष्टात आली. या दरनिश्चिती आदेशा संदर्भात मुदतवाढ देणेसाठी वरील संदर्भ क्र.२ नुसार शासनाने आदेशित केले आहे. त्याआधारे मध्यवर्ती भांडार खरेदी समितीने दि.४/३/२०१४ रोजी या दरनिश्चिती पुरवठा आदेशास दि.३०/६/२०१४ पर्यत मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे.

९०९
६/३/१४

D-8
5/3/14

तरी या आदेशान्वये शासकीय कार्यालयांना साबण फिनेल पुरवठ्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास सोबत जोडलेल्या दरसूची नुसार साबण फिनेल पुरविण्यासाठी दि.३०/६/२०१४ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

**प्रती,**

**१) मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.**
**२) उप सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई ३२**
**३) उप सचिव (उद्योग-४), मंत्रालय, मुंबई ३२**

6163 4/X 6163 D-8 Asst 4.10

"साबण, फिनेल " या बाबीच्या दरनिश्चितीबाबत.

# महाराष्ट्र शासन

उद्योग संचालनालय,

नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई- ४०० ०३२.

परिपत्रक क्र. उसं/भांखसं/ दरनिश्चिती/साबण व फिनेल/३६/२०१२-२०१३ /सी- ८९७८

दिनांक :- 4 OCT 2012

वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उ-६, दिनांक ०२/०१/१९९२.

२) भांडार खरेदी समिती निर्णय क्रमांक ११, दिनांक २७/०९/२०१२.

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस/१०८८/२५१२/उ-६, दिनांक २ जानेवारी, १९९२ च्या परिशिष्ट- पाचमध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद- ७ नुसार संबंधित महामंडळाकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच परिशिष्ट पाच (अ) मधील तरतुदीनुसार **महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना "साबण व फिनेल"** या बाबीसाठी आरक्षण देण्यात आले आहे.

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दिनांक २७/०९/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सन २०१२-२०१३ या वर्षाकरिता महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्याग मंडळ, मुंबई यांचेशी खाली दिलेल्या तक्त्यानुसार दर निश्चित केले आहेत.

| अ. क्र. | बाबींचे नांव | वजन | परिमाण | सन २०१२-२०१३ साठी समितीने निश्चित केलेले (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | स्नानाचा साबण (बाथींगबार) | १०० ग्रॅम | १ नग | १७.५० |
| २. | स्नानाचा साबण (बाथींगबार) | ७५ ग्रॅम | १ नग | १५.०० |
| ३. | डिटर्जंट वडी | १२५ ग्रॅम | १ नग | ९.५० |
| ४. | डिटर्जंट पावडर | १ किलो | १ | ४५.०० |
| ५. | लिक्विड डिटर्जट सोप | १ लिटर | १ | ४०.०० |
| ६. | कपडे धुण्याचा साबण (वॉशिंग बार) (लॉण्ड्री सोप) | २५० ग्रॅम | १ | १३.३० |
| ७. | फिनेल ब्लॅक - (२) | १ लिटर | १ | ७५.०० |
| ८. | फिनेल सफेद | १ लिटर | १ | १०५.०० |
| ९. | भांडी धुण्याचा साबण (बर्तन बार) | २५० ग्रॅम | १ | १४.६५ |
| १०. | लिक्वीड हात धुण्याचा साबण (हॅन्ड वॉश) | २५० एम.एल. | १ बॉटल | ५२.०० |
| ११. | कार्बोलिक पावडर | १ किलो | १ | ६९.०० |
| १२. | लिक्विड हेअर वॉश (शॅम्पू) | २५० एम.एल. | १ बॉटल | ६५.०० |
| १३. | मल्टीपरपज डिसइन्फेक्टन सॅनिटरी लिक्विट | १ लिटर | १ बॉटल | ११०.०० |
| १४. | कॉन्सेन्ट्रेटेड डिसइन्फेक्टन सॅनिटरी लिक्विट | १ लिटर | १ बॉटल | १६०.०० |
| १५. | अ) डिश वॉश पेस्ट | ३०० ग्रॅम | १ बॉक्स | २८.०० |
| | ब) डिश वॉश पेस्ट | १ किलो | १ कॅन | ९२.०० |
| | क) डिश वॉश पेस्ट | ५ लिटर | १ कॅन | ४२५.०० |

534 8/10/12

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | कारपेट क्लिनर | ५ लिटर | १ कॅन | ४५३.०० |
| १७. | अ) टॉयलेट बाऊल क्लिनर | ५०० एम.एल. | १ बॉटल | ३०.०० |
| | ब) टॉयलेट बाऊल क्लिनर | ५ लिटर | १ कॅन | २५०.०० |

वरील दर **दिनांक ३० जून २०१३** पर्यंत ग्राह्य राहतील. सदर दर हे सर्व कर समाविष्टित असे आहेत. तसेच खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहेत. शासनाचे अंगीकृत महामंडळ/मंडळ यांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था/सभासद व मंडळांची/महामंडळानी स्वतःच उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा व महामंडळांनी "बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये."

महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाने शासकीय विभागाकडून पुरवठा आदेश मिळाल्यावर त्यांच्याकडे नोंदणी झालेल्या घटकांकडे अन्न व औषध प्रशासन, केन्द्रीय अबकारी कर नोंदणी (Central Excise Registration) व इतर संबंधित विभागांचे परवाने आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करुन खात्री केल्यावरच पुरवठा आदेश द्यावेत.

**पुरवठा कालावधी :-** मागणीपत्र मिळाल्यापासून ६ आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकाराला माल विनिर्देशानुसार व विहित गुणवत्तेचे प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम २ आठवडयामध्ये द्यावयाची आहे व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देश प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत देणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ½% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १०% दंड.

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड.

सदरील दंडाची वसूली करण्यांची संपूर्ण जबाबदारी मागणीकाराची असेल. पुरवठा होणाऱ्या मालाची/वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकतेनुसार करावी.

उद्योग सह संचालक (भां.ख.)
विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.

**प्रति,**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,**
**१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,**
**मुंबई - ४०० ००१.**